| MHSN030020192011 | दाखल दिनांक | : | १८/१०/२०११ | | |
|---|---|---|---|---|---|
| | नोंदणी दिनांक | : | १८/१०/२०११ | | |
| | निकाल दिनांक | : | २७/०३/२०२६. | | |
| | कालावधी | : | वर्षे | महिने | दिवस |
| | | | १४ | ०५ | ०९ |

**सांगली येथील मुख्य न्यायदंडाधिकारी, यांचे न्यायालयात**

**न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, (न्यायालय क्रमांक १), सांगली.**

**(पीठासीन अधिकारी : रोहिणी सं. पाटील)**

**संक्षिप्त फौजदारी खटला क्रमांक ११३०/२०११ निशाणी ७४**

**गुन्हाः– कलम १३८ परक्राम्य संलेख अधिनियम १८८१ प्रमाणे**

| | |
|---|---|
| **फिर्यादी** | **प्रभाकर काशिनाथ तोडकर (मयत),**<br>**१/१. श्रीमती अरुणा प्रभाकर तोडकर,**<br>वय – ६७ वर्षे, व्यवसाय – घरकाम,<br>**१/२. श्रीमती मोहिनी प्रभाकर तोडकर,**<br>वय – ४२ वर्षे, व्यवसाय – घरकाम व व्यापार,<br>क्र. १ व २ रा. ८२६५/४, श्री लक्ष्मी निवास, डॉ. साकेकर हॉस्पिटल जवळ, रघुनंदन कॉलनी, बी–रोड, विश्रामबाग, सांगली.<br>**१/३. सौ. साक्षी अमित खरमाटे,**<br>वय – ३७ वर्षे, व्यवसाय – घरकाम व व्यापार,<br>रा. जयशील बंगला, खरे हाऊसिंग सोसायटी, धामणी रोड, सांगली, |

| | |
|---|---|
| | **१/४. श्री. रणजित प्रभाकर तोडकर,**<br>वय – ४१ वर्षे, व्यवसाय – व्यापार,<br>रा. ८२६५/१४, श्री पार्वती निवास, डॉ. साकेकर हॉस्पिटल जवळ, रघुनंदन कॉलनी, बी. रोड, विश्रामबाग, सांगली. |
| **फिर्यादीतर्फे विधिज्ञ** | श्री. अे. अे. पाटील. |
| **आरोपी** | **रमजान पिरसाहब मुलाणी,**<br>वय – सज्ञान, व्यवसाय – व्यापार,<br>रा. सी.एस.नं. ५५८२, प्लॉट नं. २०, अभयनगर, जुनी स्टेट बँक कॉलनीजवळ, उत्तर शिवाजीनगर, सांगली. |
| **आरोपीतर्फे विधिज्ञ** | श्री. आर. एम. तहसीलदार. |

## भाग–ब.

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | २०/०९/२०११ |
| फिर्याद दाखल केल्याचा दिनांक | १८/१०/२०११ |
| दोषारोप नोंदविलेचा दिनांक | ०९/०४/२०१३ |
| प्रकरण पुराव्याला निश्चित केल्याचा दिनांक | १४/०५/२०१३ |
| प्रकरण न्यायनिर्णयाकरिता निश्चित केल्याचा दिनांक | २७/०३/२०२६ |
| न्यायनिर्णयाचा दिनांक | २७/०३/२०२६ |
| शिक्षा दिल्याचा दिनांक, आदेश, इतर काही | दोषी |

**<u>आरोपी बाबतचा तपशील.</u>**

| आरोपी क्रमांक | आरोपीचे नाव | अटक केल्याची तारीख. | जामिनावर सोडल्याची तारीख. | दाखल गुन्हा. | शिक्षा किंवा दोषमुक्त केले ? | दिलेली शिक्षा | प्रकरण दरम्यान तुरुंगात असल्याचा कालावधी कलम ४२८ फौ.प्र.स. साठी. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | **रमजान पिरसाहब मुलाणी** | निरंक | दि.०६.०८. २०१२ | कलम १३८ परक्राम्य संलेख अधिनियम १८८१ प्रमाणे | आरोपीस दोषी ठरवण्यात येते. | एक वर्ष साधी कैद व दंड. | निरंक |

**: <u>न्यायनिर्णय</u> :**

(निकाल तारीख २७ मार्च, २०२६)

आरोपीविरुद्ध परक्राम्य संलेख अधिनियम, १८८१ चे कलम १३८ (संक्षेपाकरिता याचा उल्लेख यापुढे 'सदर अधिनियम' असा करण्यात आला आहे.) प्रमाणे प्रस्तुत खटला दाखल केला आहे.

**<u>फिर्यादीचे कथन थोडक्यात खालीलप्रमाणे आहे कीः-</u>**

२. फिर्यादी यांनी असे कथन केले आहे की, मयत फिर्यादी हे विश्रामबाग सांगली येथे राहत होते व ते सेवानिवृत्त होते. त्यांचे कुटुंब हे सांगलीतील प्रतिष्ठित,

समाजामध्ये नावलौकिक प्राप्त केलेले असे कुटुंब आहे. आरोपी हे आनंद राठी फायनान्स सर्विसेस लिमिटेड, मुंबई या कंपनीचे फ्रँचाईज आहे व ते निशा इन्व्हेस्टमेंट कन्सल्टंट फायनान्शीअल सर्विसेस या नावाने उत्तर शिवाजीनगर, सांगली येथे फ्रँचाईजचा व्यवसाय चालवतात. तसेच आरोपी हे फिजीकल फॉर्म व डी–मॅट फॉर्ममध्ये शेअर्सची खरेदी विक्री करतात. फिर्यादी व आरोपी एकमेकांना ओळखत असल्यामुळे त्यांनी आरोपीच्या वर नमूद फर्मच्या बरोबरीने वेगवेगळ्या कंपनीचे शेअर्स खरेदी विक्री करणेस सुरुवात केली. त्यांना द्यावयाच्या शेअर सर्टीफिकेट्समध्ये ABB – 750, L & T – 385, ICICI – 375, SBI – 175, HUL – 1500 आणि अन्य कंपन्यांचे विविध प्रकारातील शेअर्सचा समावेश होतो. संबंधित शेअर्स खरेदी करण्यासाठी आरोपीने फिर्यादीकडून स्टेट बँक ऑफ इंडिया, शाखा विश्रामबाग सांगली यांचेकडील धनादेश क्र. ९९१७७७ रक्कम रू. १,५७,५००/– दि. १८.०२.२०११ हे स्वीकारलेले आहेत. मात्र शेअर्स खरेदी करून संबंधित शेअर्स त्यांना देऊन व्यवहार पूर्ण करण्याच्या कर्तव्यात आरोपी अपयशी राहिला आहे. सबब आरोपीने स्वेच्छेने दि. १४.०७.२०११ रोजीचे प्रतिज्ञापत्र त्यांना करून दिले आहे आणि या प्रतिज्ञापत्राद्वारे लेखी स्वरूपात आरोपीने व्यवहार अपूर्णतेबद्दल, रक्कम परतफेडीबाबत कबुली दिलेली आहे. तसेच सदरचा व्यवहार हा आरोपीकडून अपूर्ण राहिलेबाबत आणि आरोपीकडून शेअर्स रक्कमेची परतफेड झाले नसलेबाबतची कबुली आरोपीने दिलेली आहे. तसेच सदर प्रतिज्ञापत्रामध्ये संपूर्ण रक्कमेची परतफेड दहा दिवसामध्ये केली जाईल अशी आरोपीने लेखी हमी दिलेली आहे. तसेच आरोपीने प्रस्तुत प्रतिज्ञापत्रात लेखी अभिवचन दिलेले आहे. सदरील प्रतिज्ञापत्र हे शंभर रूपयेच्या स्टॅम्पपेपरवर आरोपीने करून दिलेले आहे.

३. फिर्यादी यांनी पुढे असे कथन केले आहे की, दि. १४.०७.२०११

रोजीचे प्रतिज्ञापत्रातील नमूद दहा दिवसांचा कालावधी संपल्यानंतर आरोपीने दि. २५.०७.२०११ रोजी पुन्हा प्रतिज्ञापत्र करून दिले व ९ दिवसांच्या कालावधीत कायदेशीर देय रक्कमेच्या परतफेडीसाठी कालावधी मागितला. परंतु आरोपीने सदर कालावधीतही परतफेड केली नाही. त्यानंतर दि. ०५.०८.२०११ रोजी आरोपीने पुन्हा एक प्रतिज्ञापत्र केले व ९ दिवसांचा कालावधी मागितला. परंतु सदर कालावधी संपुष्टात येऊनही त्याने कायदेशीर देय रक्कमेची परतफेड केली नाही. सदर प्रतिज्ञापत्रामध्ये आरोपीने फिर्यादीला दि. ०८.०८.२०११ रोजी रू. १,२५,०००/- त्यांना देईल असे लेखी अभिवचन दिले आहे. परंतु कायदेशीर देय रक्कम देण्यासाठी आरोपीला मुबलक अशी संपूर्ण संधी देऊनही आरोपीने कायदेशीर देय रक्कम फिर्यादी यांना दिलेली नाही. त्यानंतर फिर्यादीने अनेकवेळा आरोपीला प्रत्यक्ष भेटून वारंवार फोन करून संबंधित पूर्ण शेअर्स त्यांना देण्याबाबत व सदरचे शेअर्स फिजीकल फॉर्ममध्ये अधिकृतपणे सर्व पूर्तता करून अटेस्टेड सिग्नेचर-ट्रान्सफर फॉर्मस मध्ये देण्याबाबत विनंती केली. सदर कायदेशीर देय रक्कमेच्या परतफेडीपोटी आरोपीने फिर्यादी यांना ओरिएंटल बँक ऑफ कॉमर्स, शाखा सांगली यांचेकडील धनादेश क्र. ०८०५४५ रक्कम रू. १,५७,५००/- दि. १८.०२.२०११ रोजीचा दिला. सदरील धनादेश फिर्यादी यांनी त्यांचे एच.डी.एफ.सी.बँक, शाखा सांगली या बँकेमधील खाते क्र. १०२२२१९३०००१५५९ मध्ये जमा करण्यास दिला असता सदरचा धनादेश हा 'फंड्स इनसफिशिएंट' असा शेरा मारून न वठता बँकेचा दि. ०८.०८.२०११ रोजीचा मेमो फिर्यादी यांना परत आला.

४. फिर्यादी यांनी पुढे असे कथन केले आहे की, सदरील न वठलेल्या धनादेशाबाबत फिर्यादीने आरोपीला दि. ०३.०९.२०११ रोजी कायदेशीर देय

असलेली रक्कम मागणी नोटीस पाठवली. सदरील नोटीस ही आरोपीला दि. ०५.०९.२०११ रोजी प्राप्त झाली. सदर नोटीसेस आरोपीने दि. १०.०९.२०११ रोजी खोट्या मजकुराची त्याच्या वकीलांमार्फत उत्तरी नोटीस पाठविली. सदरील नोटीस फिर्यादीला दि. १५.०९.२०११ रोजी प्राप्त झाली. सदर उत्तरी नोटीसीमध्ये आरोपीने फिर्यादी व आरोपी यांचेमधील संबंधाबाबत फिजीकल शेअर्सच्या खरेदीबाबत त्यांनी आरोपीला रक्कम दिलेबाबत, तसेच कायदेशीर देय रक्कमांच्या परतफेडीपोटी वेगवेगळे धनादेश आरोपीने त्यांना दिलेबाबत व अशा विविध धनादेशापैकी प्रस्तुतचा धनादेश असलेबाबत आरोपीने उत्तरी नोटीसीत मान्य केले. मात्र सदर उत्तरी नोटीसीमध्ये सर्व धनादेश हे सिक्युरिटी म्हणून दिलेबाबत खोटे कथन आरोपीने केले आहे. सदर धनादेशाद्वारे त्यांनी रक्कम जमा केली होती, तसेच सदरची गुंतवणूक ही त्यांनी आरोपीने दिलेल्या सल्ल्यानुसार केलेली आहे असे आरोपीने उत्तरी नोटीसीत मान्य केले आहे. वरील कारणास्तव फिर्यादीने आरोपीविरुद्ध सदर अधिनियमचे कलम १३८ अन्वये खटला दाखल केला.

५. प्रस्तुत प्रकरणात आरोपीविरुद्ध आदेशिका दि. २७.०३.२०१२ रोजी जारी झाली. माझे पूर्व पिठासिन अधिकारी यांनी निशाणी १५ प्रमाणे सदर अधिनियमचे कलम १३८ प्रमाणे आरोपीवर दोषारोप ठेवले. आरोपीने गुन्हा नाकबूल असल्याचे सांगितले व खटला चालविण्याची तयारी दर्शवली.

६. प्रस्तुत प्रकरणातील फिर्यादी हे दि. १७.०७.२०१३ रोजी सांगली येथे मयत झाले. त्यानंतर फिर्यादीतर्फे त्यांचे कायदेशीर वारस यांनी न्यायालयाकडे अर्ज केला व निशाणी १९ वरील आदेशाप्रमाणे फिर्यादींचे कायदेशीर वारस यांना अभिलेखावर दाखल करून घेतले व प्रस्तुतचे प्रकरण चालवण्याची त्यांना परवानगी

देण्यात आली. त्याप्रमाणे फिर्यादी यांचे कायदेशीर वारसांतर्फे प्रस्तुत प्रकरणात पुरावा निशाणी ५९ प्रमाणे देण्यात आला. प्रस्तुत प्रकरणात आरोपीने हजर राहून उलटतपास न घेतल्याने आरोपीतर्फे उलटतपास नाही असा आदेश दि. १२.०३.२०२६ रोजी पारित करण्यात आला. फिर्यादी यांनी पुरावा निशाणी ७१ प्रमाणे पुरसीस देत दि. १२.०३.२०२६ रोजी बंद केला.

७. दरम्यान प्रस्तुत प्रकरणातील आरोपी हा वारंवार न्यायालयात गैरहजर राहत असल्याने त्याचेविरुद्ध वेळोवेळी अजामीनपात्र वॉरंट काढण्यात आलेले आहे. त्याचे अहवाल अभिलेखावर दाखल आहेत. सदरील अहवालामध्ये आरोपी हा दिलेल्या पत्त्यावर मिळून येत नसल्याचे नमूद आहे. त्यानंतर आरोपी मिळून येत नसल्याने त्याच्या नावे जाहीरनामा निशाणी ६१ वरील आदेशाप्रमाणे काढण्यात आला. सदरील जाहीरनामा बजावणीचा अहवाल दि. ११.०२.२०२६ हा अभिलेखावर निशाणी ६२ प्रमाणे दाखल आहे. तरीदेखील आरोपी न्यायालयात हजर झाला नाही. प्रस्तुतचा आरोपी हा जाणूनबुजून न्यायालयात हजर राहत नाही असे गृहीत धरून मा. उच्च न्यायालय यांचेकडील न्यायनिवाडा नवनीत सिंग गोजिया व सिमरन कौर वि. स्टेट ऑफ महाराष्ट्र आणि सुषमा चांडक क्रिमिनल रिव्हीजन अर्ज नं. ७०/२०२३ निकाल ता. २०.०९.२०२४ चे अवलोकन करून फिर्यादीतर्फे दाखल अर्ज निशाणी ७२ वर आदेश पारित करत आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ प्रमाणेचे बयाण Dispensed with केल्याने नोंदवण्यात आलेले नाही. आरोपीने कोणताही साक्षीदार तपासलेला नाही.

८. फिर्यादी पक्षातर्फे विद्वान वकील श्री. अे. अे. पाटील यांचा युक्तिवाद ऐकला. आरोपीने युक्तिवाद केलेला नाही. सबब, सदरील प्रकरण आरोपीच्या

युक्तिवादाशिवाय अभिलेखावर उपलब्ध पुराव्याचे अवलोकन करून निकाली करण्यात येते. सादर केलेल्या पुराव्याचे परिशीलन केल्यानंतर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर खालील मुद्दे माझे विचारार्थ निघाले असुन त्या मुद्द्यावरील निष्कर्ष खालीलप्रमाणे नोंदविण्यात आले आहेत.

| **अ. क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १ | फिर्यादीने हे सिद्ध केले आहे काय की, तथाकथित वादातील धनादेश क्र. ०८०५४५ दि. १८.०२.२०११ रोजीचे रक्कम रु. १,५७,५००/- हा आरोपीने फिर्यादीस कायदेशीर उत्तर दायित्वापोटी त्याचे कायदेशीर देणेबाबत दिला होता ? | **होकारार्थी** |
| २ | फिर्यादीने हे सिद्ध केले आहे काय की, वादातील धनादेश हा आरोपीच्या खात्यावर ''अपर्याप्त निधी'' या शेऱ्यानिशी दि. ०८.०८.२०११ रोजी अनादरित झाला ? | **होकारार्थी** |
| ३ | फिर्यादीने हे सिद्ध केले आहे काय की, धनादेश न वटल्याबाबत आरोपीस दि.०३.०९.२०११ रोजी पाठवलेली नोटीस त्यास दि. ०५.०९.२०११ रोजी मिळून देखील त्याने विहित मुदतीत न वटलेल्या धनादेशाच्या रकमेचा भरणा केला नाही ? | **होकारार्थी** |
| ४ | आदेश काय ? | **अंतिम आदेशाप्रमाणे** |

**: कारणमीमांसा :**

९. परक्राम्य संलेख अधिनियम १८८१ कलम १३८ चा गुन्हा शाबीत होणेकामी खालील घटक शाबीत होणे गरजेचे आहेः-

अ. फिर्यादी यांना आरोपीने धनादेश हा कायदेशीर देणे देण्याकरिता दिलेला होता.

ब. सदरचे धनादेश फिर्यादी यांनी बँकेत विहित मुदतीत सादर केले.

क. विहित मुदतीतच ते अनादरित झाले.

ड. फिर्यादी यांनी आरोपीला धनादेश रक्कम मागणीची कायदेशीर नोटीस विहित मुदतीत अचूक पत्त्यावर पाठविली.

**मुद्दा क्र.१ बाबत**

१०. फिर्यादी यांनी त्यांच्या फिर्यादीप्रमाणे पुरावा दिलेला आहे. सदर फिर्यादीच्या कथनांचे अवलोकन केले असता आरोपीने फिर्यादीकडून शेअर्स खरेदीविक्रीमधून फिर्यादीला पैसे मिळवून देण्याचे आश्वासन दिले व त्यापोटी फिर्यादीकडून स्टेट बँक ऑफ इंडिया, शाखा विश्रामबाग सांगली यांचेकडील धनादेश क्र. ९९१७७७ रक्कम रू. १,५७,५००/– दि. १८.०२.२०११ व वेळोवेळी अन्य धनादेशामागे रक्कम घेतली होती. मात्र आरोपीने सदरील रक्कमेचे शेअर्स खरेदी करून संबंधित शेअर्स मूळ फिर्यादी यांना देऊन व्यवहार पूर्ण करण्याच्या कर्तव्यात आरोपी अयशस्वी झाला. त्यामुळे त्याने स्वेच्छेने दि. १४.०७.२०११ रोजीचे मूळ प्रतिज्ञापत्र फिर्यादी यांना करून दिले व रक्कम परतफेड दहा दिवसात करेन असे आश्वासन दिले. मात्र आरोपीने दहा दिवसात म्हणजेच दि. २५.०७.२०११ रोजी पुन्हा प्रतिज्ञापत्र करून दिले व सदरील रक्कम नऊ दिवसात परतफेड करेन असे आश्वासन दिले. मात्र आरोपीने प्रतिज्ञापत्रामध्ये नमूद असलेली रक्कम रू. १,२५,०००/– दि. ०८.०८.२०११ पर्यंत कबूल केल्याप्रमाणे परत केली नाही व सदर रक्कमेच्या परतफेडीसाठी धनादेश क्र. ०८०५४५ दि. १८.०२.२०११ रोजी रक्कम रू. १,५७,५००/– किमतीचा दिला.

सदर कथनांच्या समर्थनाकामी प्रस्तुतचा दावा चालवण्याबाबत दिलेले वटमुखत्यारपत्र निशाणी ६५, वादग्रस्त धनादेश क्र. ०८०५४५ दि. १८.०२.२०११ निशाणी ६६ व रक्कम रू. १,५७,५००/– धनादेश क्र. ९९१७७७ ने निशा इन्व्हेस्टमेंट कन्सल्टंट यांचेकडे मिळाली असल्याबाबतची पावती क्र. १० निशाणी ७१ प्रमाणे अभिलेखावर दाखल केलेली आहे.

११.    साक्षीदारांच्या वरील तोंडी व कागदोपत्री पुराव्याचे अवलोकन केले असता प्रस्तुत प्रकरणातील वादग्रस्त धनादेश हा आरोपीने त्याचे कायदेशीर देणे भागवण्यासाठी दिला होता असे नमूद केले आहे. परक्राम्य संलेख अधिनियम कलम १३९ प्रमाणे असलेल्या गृहितकानुसार जोपर्यंत आरोपी वादग्रस्त धनादेश कायदेशीर देण्यापोटी दिलेला नव्हता, हे शाबीत करत नाही तोपर्यंत वादग्रस्त धनादेश कायदेशीर देण्यापोटीच दिला होता, असे गृहीत धरले जाते. सदर गृहीतकाचे खंडन करण्याची जबाबदारी आरोपीवर आहे. सदर गृहीतकाचे खंडन आरोपी हा फिर्यादी पक्षाचे तोंडी अथवा कागदोपत्री पुराव्याचे आधारे करू शकतो. जर सदरचे गृहीतक आरोपीने खंडन केले तर आरोपी फिर्यादीस कसे कायदेशीर देणे लागतो हे सिद्ध करण्याची जबाबदारी फिर्यादीवर येते. सबब अभिलेखावर आरोपीने त्याच्या बचावादरम्यान सदरील धनादेश हा कायदेशीर दायित्वाकामी दिला नव्हता या कामी काय पुरावा आणला आहे पाहणे गरजेचे आहे.

१२.    प्रस्तुत प्रकरणातील आरोपीने न्यायालयात हजर राहून साक्षीदाराचा उलटतपास घेतलेला नाही. प्रस्तुत प्रकरणातील अभिलेखाचे अवलोकन केले असता आरोपी व फिर्यादी यांचेमध्ये तडजोड झाल्याबाबतचा मेडिएशन अहवाल अभिलेखावर दाखल आहे. आरोपीने फिर्यादीचा उलटतपास घेऊन कायदेशीर देय देणे असलेली

रक्कम विवादीत केलेली नाही. आरोपीतर्फे वादग्रस्त धनादेश फिर्यादीच्या ताब्यात कसा आला याबाबत देखील कोणताही पुरावा अभिलेखावर आलेला नाही. वरील कारणास्तव आरोपीने सदर अधिनियमचे कलम १३९ प्रमाणे असलेले गृहीतकाचे खंडन केलेले नाही.

१३. वरील सर्व पुराव्याचे अवलोकन केले असता आरोपी हा आनंदराठी फायनान्शिअल सर्विस लिमिटेड मुंबई व निशा इन्व्हेस्टमेंट कन्सल्टंट फायनान्शिअल सर्विसेस या नावाने फ्रेंचायजी चालवत होता, वेळोवेळी त्याने फिर्यादीकडून धनादेशाने व इतर प्रकारे शेअर्स खरेदी करण्यासाठी रक्कम घेतलेली होती व त्याबाबत फिर्यादीला वेळोवेळी पावत्या दिलेल्या होत्या, मात्र सदरील रक्कमेचे आरोपीने फिर्यादीसाठी शेअर्स खरेदी न केल्याने आरोपीने स्वतः फिर्यादीला प्रतिज्ञापत्र लिहून देऊन त्याचे कायदेशीर देयत्व मान्य केलेले आहे. वरील सर्व पुराव्याचा व सदर अधिनियमचे गृहीतक कलम १३९ चा विचार केला असता आरोपीने कायदेशीर देय विवादीत न केल्याने प्रस्तुत प्रकरणातील वादग्रस्त धनादेश हा कायदेशीर देयत्वापोटी दिला होता ही बाब वाजवी संशयापलीकडे शाबीत होते. वरील कारणास्तव मी मुद्दा क्र. १ चे उत्तर होकारार्थी देत आहे.

**मुद्दा क्र.२ बाबत**

१४. फिर्यादीने वादग्रस्त धनादेश निशाणी ६६ दि. १८.०२.२०११ रोजीचा वठण्यासाठी बँकेत भरला. मात्र वादग्रस्त धनादेश 'अपर्याप्त निधी' अशा शेऱ्यानिशी अनादरित झाले व त्याबाबतचा परतावा दि. ०८.०८.२०११ रोजीचा फिर्यादीला प्राप्त झाला. सदर कथनांचे समर्थनाकामी फिर्यादीने निशाणी ६७ प्रमाणे धनादेश परतावा दाखल केलेला आहे. सदरील पुराव्याकामी फिर्यादीतर्फे साक्षीदारांचा कोणताही

उलटतपास घेण्यात आलेला नाही.

१५. मात्र परक्राम्य संलेख अधिनियम कायदा कलम १४६ चे गृहीतकाचे प्रमाणे जोपर्यंत अशी वस्तुस्थिती नाकारण्यात येत नाही तोपर्यंत धनादेश परताव्यावर धनादेश अनादरित झाल्याची खूण, सही व अधिकृत शिक्का असल्यास त्यावर नमूद असलेला धनादेश हा अनादरित झाला असे म्हणता येईल. प्रस्तुत प्रकरणात आरोपीतर्फे धनादेश परतावा विवादीत करण्यात आलेला नाही. सबब, निशाणी ६६ वरील धनादेश हा न वटता दि. ०८.०८.२०११ रोजी परत आला होता असे वाजवी संशयापलीकडे शाबीत झाले आहे. वरील कारणास्तव मी मुद्दा क्र. २ चे उत्तर होकारार्थी नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्र.३ बाबत</u>**

१६. फिर्यादी पुढे असे कथन करतो की, वादग्रस्त धनादेश न वटल्याने त्याबाबत फिर्यादीने आरोपीला दि. ०३.०९.२०११ रोजी वकीलांमार्फत नोटीस निशाणी ६८ प्रमाणे पाठविली होती. सदरील नोटीस आरोपीने स्वीकारली. त्या बाबतची पोहोच पावती निशाणी ६९ प्रमाणे अभिलेखावर दाखल आहे.

१७. प्रस्तुत प्रकरणातील निशाणी ६८ व ६९ वरील कागदपत्रांचे अवलोकन केले असता त्यावरील आरोपीचा पत्ता व निशाणी १ वरील आरोपीचा पत्ता हा एकच असल्याचे दिसून येते. प्रस्तुत प्रकरणातील आरोपीला या न्यायालयाचे समन्स निशाणी १ वर नमूद असलेल्या पत्त्यावर लागू झालेली आहे व आरोपी त्याच पत्त्यावर समन्स लागल्यानंतर न्यायालयात हजर झालेला आहे. सबब, सदरील नोटीस ही आरोपीच्या बरोबर पत्त्यावर पाठविण्यात आलेली होती असे गृहीत धरणे चुकीचे ठरणार नाही.

आरोपीने फिर्यादीला उत्तरी नोटीस पाठवलेली होती. मात्र उत्तरी नोटीसमध्ये घेतलेला बचाव आरोपीने फिर्यादीचा उलटतपास घेऊन अभिलेखावर आणलेला नाही. सबब, आरोपीने निशाणी ६८ वरील नोटीस दि. ०५.०९.२०११ रोजी विहित कालावधीमध्ये मिळाली होती ही बाब शाबीत होते. वरील कारणास्तव मी मुद्दा क्र.३ चे उत्तर होकारार्थी देत आहे.

**<u>मुद्दा क्रमांक ४ बाबतः–</u>**

१८. सदर प्रकरणातील आरोपी यांचेविरुद्ध निशाणी ६६ वरील धनादेश हा कायदेशीर देयत्वापोटी देण्यात आला होता. सदरील धनादेश अनादरित झाल्यानंतर आरोपीने त्यास मागणी नोटीस पाठवली होती व सदरील मागणी नोटीस मिळाल्यानंतरदेखील आरोपीने कायदेशीररीत्या देय असलेली रक्कम फिर्यादीला परत केलेली नाही हे शाबीत झालेले आहे. वरील कारणास्तव सबळ पुराव्याअभावी नोंदवण्यात आलेला दोषारोप वाजवी संशयापलीकडे शाबीत होतो. सबब, सदरील आरोपीस दोषी ठरवण्यात येते. मात्र आरोपी व त्याचे वकील हे त्यांचे शिक्षेबद्दल म्हणणे सांगण्याकामी न्यायालयात हजर नाहीत. फिर्यादीचे वकील न्यायालयात हजर. फिर्यादीचे वकिलांनी आरोपीला जास्तीत जास्त शिक्षा द्यावी अशी विनंती केली आहे.

१९. युक्तिवाद ऐकला. प्रस्तुतचे प्रकरणाचे स्वरूप पाहता सदरील प्रकरण हे आर्थिक स्वरूपाचे असल्याचे माझ्या निदर्शनास येते. सबब, आरोपीला अपराधी परिविक्षा अधिनियमचा फायदा देणे योग्य होणार नाही. प्रस्तुत प्रकरणातील धनादेश हा रक्कम रू. १,५७,५००/– चा आहे व सदरील प्रकरण हे सन २०११ पासून न्यायालयात प्रलंबित आहे. सदर प्रलंबित प्रकरणामध्ये फिर्यादीच्या वारसांना झालेला

शारीरिक, आर्थिक व मानसिक त्रास याचा एकंदरीतच विचार केला असता आरोपीला कैद व दंड सुनावणे गरजेचे आहे असे या न्यायालयाचे मत आहे व जमा दंड रक्कम फिर्यादीला नुकसानभरपाई देणे न्यायोचित राहील असे देखील या न्यायालयाचे मत आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे,

## आदेश

१. आरोपी **रमजान पिरसाहब मुलाणी** यांना फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम २५५(२) अन्वये परक्राम्य संलेख अधिनियम कायदा कलम १३८ चे गुन्ह्याकामी दोषी ठरवण्यात येत आहे.

२. सदरील गुन्ह्यात आरोपीस एक वर्षाकरिता साधी कैद व दंड म्हणून रक्कम रू. २,२५,०००/- (अक्षरी रुपये दोन लाख पंचवीस हजार फक्त) अशी शिक्षा ठोठावण्यात येते. आरोपीने दंड भरला नाही तर त्यास सहा महिन्याच्या साध्या कैदेची शिक्षा सुनावण्यात येते.

३. सदरील दंडाची रक्कम फिर्यादीला फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३५७(३) प्रमाणे नुकसान भरपाई म्हणून देण्यात यावी.

४. आरोपीचे रोख रक्कमेचा जामीन सरकार जमा करण्यात येतो.

५. आरोपीविरुद्ध शिक्षा वॉरंट जारी करण्यात येते.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.)

ROHINI SAMBHAJI PATIL
Digitally signed by ROHINI SAMBHAJI PATIL
Date: 2026.04.01 15:01:38 +0530

**(रोहिणी सं. पाटील)**

**सांगली.** **न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, (कोर्ट क्र.१),**

**दिनांक – २७/०३/२०२६.** **सांगली.**

**परिशिष्ट – भाग क.**

**फिर्यादीचे साक्षीदारांची यादी.**

| **क्रमांक.** | **निशाणी क्र.** | **नाव** | **पुराव्याचा प्रकार.** |
|---|---|---|---|
| साक्षीदार क्र. ०१ | निशाणी ५९ | मोहिनी प्रभाकर तोडकर | फिर्यादी क्र. १/२ |

**फिर्यादीतर्फे दाखल कागदपत्रांच्या निशाण्यांची यादी**

| **अ.क्र.** | **निशाणी क्र.** | **कागदपत्र** |
|---|---|---|
| १ | आर्टिकल 'अ' | नोटराईज्ड मुखत्यारपत्राची प्रत. |
| २ | निशाणी ६४ | रद्द केलेल्या कुलमुखत्यारपत्राची सत्यपत्र. |
| ३ | निशाणी ६५ | मोहिनी तोडकर यांनी प्रकरण चालविण्याबाबतचे कुलमुखत्यारपत्र. |
| ४ | निशाणी ६६ | आरोपीने दिलेला मूळ धनादेश दि.१८.०२.२०११ |
| ५ | निशाणी ६७ | धनादेश परतावा दि.०८.०८.२०११. |
| ६ | निशाणी ६८ | रक्कम मागणी नोटीस दि. ०३.०९.२०११. |
| ७ | निशाणी ६९ | पोस्टल अभिस्विकृती पावती. |
| ८ | निशाणी ७० | रक्कम रू. १,५७,५००/– धनादेश क्र. ९९१७७७ ने निशा इन्व्हेस्टमेंट कन्सल्टंट यांचेकडे मिळाली असल्याबाबतची पावती क्र. १०. |

**आरोपीचे साक्षीदारांची यादी.**

| **क्रमांक.** | **निशाणी क्र.** | **नाव** | **पुराव्याचा प्रकार.** |
|---|---|---|---|
| –––– | –––– | –––– | –––– |

**आरोपीतर्फे दाखल कागदपत्रांच्या निशाण्यांची यादी**

| **अ.क्र.** | **निशाणी क्र.** | **कागदपत्र** |
|---|---|---|
| | –––– | –––– |

न्यायालयाच्या साक्षीदारांची यादी

| अ.क्र. | निशाणी क्र. | कागदपत्र |
|---|---|---|
| | ---- | ---- |

न्यायालयाच्या निशाण्यांची यादी

| अ.क्र. | निशाणी क्र. | कागदपत्र |
|---|---|---|
| | ---- | ---- |

ROHINI SAMBHAJI PATIL
Digitally signed by ROHINI SAMBHAJI PATIL
Date: 2026.04.01 15:01:44 +0530

(रोहिणी सं. पाटील)

सांगली. न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, (कोर्ट क्र.१),

दिनांक – २७/०३/२०२६. सांगली.

## C E R T I F I C A T E

"I affirm that the contents of this P.D.F. file Judgment are same word for word as per original Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of steno | : | Shri. S. A. Jamadar |
| Court Name | : | Smt. R. S. Patil,<br>J.M.F.C., (Court no.1), Sangli |
| Date of Judgment | : | 27/03/2026. |
| Judgment signed by<br>Presiding Officer on | : | 27/03/2026. |
| Judgment uploaded on | : | 27/03/2026. |